# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१ /का.६,
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८/१२/२०१६

प्रति,
जिल्हाधिकारी,
औरंगाबाद

विषय :- <u>पैठण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०१६</u>
श्री. रावसाहेब दानवे, प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी यांच्या
दि.१७/१२/२०१६ च्या पैठण येथील प्रचार सभेमधील वक्तव्याबाबत...
संदर्भ :- १. आपले पत्र क्र.जा.क्र.२०१६/नपाप्र/कावि/६३७, दि.१९/१२/२०१६
२. आपले पत्र क्र.जा.क्र.२०१६/नपाप्र/कावि/६४१, दि.२०/१२/२०१६

महोदय,

आपल्या उपरोक्त संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने श्री. रावसाहेब दानवे, प्रदेशाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी यांनी दि.१७/१२/२०१६ रोजी पैठण नगरपरिषदेच्या प्रचारसभेमध्ये केलेल्या वक्तव्याबाबतचा आपला अहवाल आयोगास प्राप्त झाला. निवडणूक निर्णय अधिकारी, पैठण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक, २०१६ यांनी श्री. रावसाहेब दानवे यांना दिलेली कारणे दाखवा नोटीस व या नोटीशीस श्री.रावसाहेब दानवे यांनी दिलेले उत्तरही आपल्या अहवालासोबत आयोगास प्राप्त झाले.

२. आयोगाने या सर्व अहवालांचा तसेच श्री. रावसाहेब दानवे यांनी दिलेल्या उत्तराचा अभ्यास केला. त्याअंती आयोगाच्या असे निदर्शनास आले की, श्री. रावसाहेब दानवे यांचे वक्तव्य "आज सतरा तारीख आहे, आणि उद्या अठराला मतदान आहे, आपल्याला सगळयांना घरी जायची गडबड झालेली आहे. त्याचे कारण आहे की, निवडणुकीमध्ये निवडणुकीची पहिली रात्र ती अत्यंत महत्वाची अशी असते, कदाचित अचानकपणाने लक्ष्मीदर्शनसुध्दा निवडणुकीच्या अगोदर एक दिवस होत असते, त्यामुळे अशी लक्ष्मी जर घरी आली तर तिला परत करु नका, तीचे स्वागत करा पण मतदानाचा जो निर्धार केला आहे पक्का, तो निर्धार पक्का ठेवा. कमळ या निशाणीचे बटन दाबा. आणि भारतीय जनता पार्टीचे जे उमेदवार आहेत

सुरजजी लोळगे यांना नगराध्यक्षपदी निवडून द्या एवढीच विनंती करण्यासाठी मुद्दामहून याठिकाणी आलेलो आहे." हे मतदारांना मतदान करण्यासाठी पैसे स्विकारण्याचे आव्हान करणारे आहे.

श्री. रावसाहेब दानवे यांनी निवडणुकीच्या एक दिवस आधी लक्ष्मी जर घरी आली तर तिला परत करु नका, तिचे स्वागत करावे असे जे वक्तव्य केले आहे ते निश्चितपणे मतदारांना मतदान करण्यासाठी पैसे (लाच) घेण्यास प्रवृत्त करणारे व तशा प्रकारचे आव्हान करणारे आहे.

३. त्यामुळे श्री. रावसाहेब दानवे यांनी भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ ब आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम २२ (१) अन्वये गुन्हा आहे. तरी यासंबंधाने आपण तात्काळ संबंधित पोलिस स्टेशनमध्ये श्री. रावसाहेब दानवे यांच्याविरुध्द त्यांच्या उपरोक्त वक्तव्यासाठी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करावा व त्याचा पाठपुरावा करावा.

४. केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आयोगास तात्काळ सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(ध. मा. कानेड)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग

D:\DS-Kaned\नप निवडणूक नोव्हेंबर २०१६.docx.RSK